# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड,

## अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभाग

## ई-निविदा सुचना ( तिसऱ्यांदा )

ई-निविदा सुचना क्र. : नांवाशमनपा/अवअसे/ई-निविदा/ 61 /2026 Date:- 17/07/2026

नांदेड महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागासाठी बाहयस्त्रोताव्दारे **राष्ट्रीय/राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादामी, मुंबई यांचा अग्निशमन प्रशिक्षण पाठयक्रम पुर्ण केलेले** प्रशिक्षित अग्निशामक (Fireman) व प्रशिक्षित वाहनचालक कंत्राट पध्दतीने उपलब्ध करुन देण्यासाठी मनुष्यबळ पुरवठा करणाऱ्या नोंदणीकृत संस्थेमार्फत विहित नमुन्यात Online निविदा मागविण्यात येत आहे. निविदा फक्त अधिकृत पुरवठाधारकांना महानगरपालिकेच्या *(https://mahatenders.gov.in)* या वेबसाईट वरुन खरेदी करता येतील व भरता येतील. निविदाधारकांनी निविदा दाखल करतांना लिफाफा क्र.०१ (कागदपत्रे), लिफाफा क्र.०२ (दरपत्रक), निविदा अटी व शर्तीमधील सर्व सुचनांचे काटेकोरपणे पालन करुन निविदा दाखल करणे बंधनकारक राहील. सर्व अधिकृत निविदाधारक यांना Digital Signature चे रजिस्ट्रेशन करणे अनिवार्य आहे. सदरील ई-निविदा संदर्भात निविदा प्रारुप व निविदा सोबतच्या इतर सर्व अटी व शर्ती नांदेड महानगरपालिकेच्या www.nwcmc.gov.in या वेबसाईटवर व अग्निशमन विभाग आणि महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील नोटीस बोर्डावर पहावयास मिळतील.

| तपशिल | दिनांक | वेळ |
|---|---|---|
| ई-निविदा प्रकाशित करणे | **17.07.2026** | **दुपारी 3.00 वाजता** |
| ई-निविदा डाऊनलोड करणे | **17.07.2026** | **दुपारी 3.00 वाजता** |
| ई-निविदा भरणे | **17.07.2026** | **दुपारी 3.00 वाजता** |
| ई-निविदा भरण्याचा अंतिम दिनांक व वेळे | **23.07.2026** | **दुपारी 3.00 वाजता** |
| ई-निविदा उघडणे | **24.07.2026** | **दुपारी 3.00 वाजता** |

| अ. क्र. | कामाचे नांव | पदाचे नांव | पुरवठा करावयाची संख्या | निविदेचे अंदाजीत वार्षिक मुल्य | इसारा रक्कम (EMD) | निविदेची किंमत (२८ % GST सहित) | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नांदेड महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागा साठी बाहयस्त्रोताव्दारे प्रशिक्षित अग्निशामक (Fireman) व प्रशिक्षित वाहनचालक पुरवठा करणे बाबत. | अग्निशामक (Fireman) | २५ | १,२०,००,०००/- | १,२०,०००/- | १२८० | (एका वर्षासाठी) |
| | | वाहनचालक | ०५ | | | | |

( मा. आयुक्त, मनपा नांदेड यांचे मान्यतेने )

स्वाक्षरीत/-

अतिरिक्त आयुक्त,

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

***प्रतिलिपी माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव :-***

१) मा.संपादक, दैनिक---------------------------------------------, यांना देऊन विनंती करण्यात येते की, सदरील निविदा सूचना आपल्या अंकात दिनांक :- / /२०२६ च्या दैनिकात कमीत कमी स्तंभ ---- X ---- चौ.से.मी. मध्ये शासकीय दराप्रमाणे प्रसिध्द करुन अंकात तीन प्रति व बिलाच्या दोन प्रतिसह कार्यालयात शासनमान्य दराची प्रतिजोडून सादर करावे.

२) मुख्य लेखा परिक्षक, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

३) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

४) नोटीस बोर्ड, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

५) सिस्टीम मॅनेजर, ई-निविदा कक्ष, संगणक विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

६) जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क विभाग, मनपा नांदेड यांना प्रत देवुन कळविण्यात येते की, सदरील ई-निविदा बाबत सुचना आपल्या विभागामार्फत नियमानुसार प्रसिध्द करण्याबाबत आवश्यकती कार्यवाही विहित मुदतीत करावी.

अतिरिक्त आयुक्त,

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड,

अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभाग

ई-निविदा सुचना ( तिसऱ्यांदा )

ई-निविदा सुचना क्र. : नांवाशमनपा/अवअसे/ई-निविदा/ 61 /२०२६ Date:- 17/07/2026

नांदेड महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागासाठी बाहयस्त्रोताव्दारे **राष्ट्रीय/राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादामी, मुंबई यांचा अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम पुर्ण केलेले** प्रशिक्षित **अग्निशामक** (Fireman) २५ व **प्रशिक्षित** वाहनचालक ०५ कंत्राट पध्दतीने उपलब्ध करुन देण्यासाठी मनुष्यबळ पुरवठा करणाऱ्या **नोंदणीकृत** संस्थेमार्फत विहित **नमुन्यात** तिसऱ्यांदा **ई-निविदा मागविण्यात येत आहे. निविदा फक्त अधिकृत पुरवठाधारकांना महानगरपालिकेच्या *(https://mahatenders.gov.in)*** या वेबसाईट वरुन **खरेदी करता येतील व** भरता येतील. निविदाधारकांनी निविदा दाखल करतांना निविदा अटी व शर्तीमधील सर्व सुचनांचे काटेकोरपणे पालन करुन निविदा दाखल करणे बंधनकारक राहील. सदरील ई-निविदा संदर्भात सविस्तर तपशील www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. तसेच निविदा प्रारुप व इतर सर्व अटी व शर्ती नांदेड महानगरपालिकेच्या www.nwcmc.gov.in या संकेतस्थळावर व अग्निशमन विभाग आणि महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील नोटीस बोर्डावर पहावयास मिळतील.

(मा.आयुक्त यांचे मान्यतेने)

दिनांक - 17/07/2026

स्वाक्षरीत/-

उपआयुक्त(अग्निशमन)

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

***<u>प्रतिलिपी माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव</u>:-***

१) मा.संपादक, दैनिक सकाळ (राज्य) / दै. लोकमत, यांना देऊन विनंती करण्यात येते की, सदरील ई-निविदा सूचना आपल्या अंकात **दिनांक** :-18/07/२०२६ च्या दैनिकात कमीत कमी स्तंभ -8 x 12 चौ.से.मी. मध्ये शासकीय दराप्रमाणे प्रसिध्द करुन अंकात तीन प्रति व बिलाच्या दोन प्रतिसह कार्यालयात शासनमान्य दराची प्रतिजोडून सादर करावे.

२) नोटीस बोर्ड, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

३) जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क विभाग, मनपा नांदेड यांना प्रत देवुन कळविण्यात येते की, सदरील ई-निविदा सुचना प्रसिध्दीबाबत आपल्या विभागामार्फत नियमानुसार कार्यवाही विहित मुदतीत करावी.

उपआयुक्त(अग्निशमन)

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागासाठी बाहयस्त्रोताव्दारे
प्रशिक्षित अग्निशामक (Fireman) व वाहनचालक पुरवठा करणे बाबत.

**टिप – निविदाधारकांनी खालील निविदा नियम, अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे.**

१. सदर ई-निविदा बाबत सविस्तर माहिती (https://mahatenders.gov.in) या संकेत स्थळावर व नांदेड महानगरपालिकेच्या www.nwcmc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

२. निविदा पत्रक किंमत, EMD रक्कम ऑनलाईन सिस्टीमव्दारे भरण्यात यावी. चेकने रक्कम स्विकारली जाणार नाही. तसेच सदर निविदा केवळ ऑनलाईन दाखल करता येईल, पोस्टाव्दारे अथवा प्रत्यक्ष कार्यालयात स्विकारली जाणार नाही.

३. निविदा दोन लिफाफा पध्दतीने ऑनलाईन सादर कराव्यात. निविदा फॉर्म फी परत केली जाणार नाही.

४. आलेल्या निविदामधील कोणतीही एक निविदा स्विकारण्याचा किंवा सर्वच निविदा नाकारण्याचा अधिकार मा.आयुक्त, मनपा नांदेड यांनी राखून ठेवलेला आहे. त्याबद्दल कोणतेही स्पष्टीकरण दिले जाणार नाही.

५. निविदा विधी ग्राहयता कालावधी १२० दिवसांचा असेल.

६. सदर कामी करारनामा तयार करुन मुंबई मुद्रांक अधिनियम १९९८ या कायदयांतर्गत सदर करारनाम्यावर अपेक्षित मुद्रांक शुल्क् भरुन कायदेशीर कारवाई निविदाधारकांमार्फत करण्यात यावी.

७. निविदा बयाणा / सुरक्षा अनामत रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज किंवा विलंब आकार दिले जाणार नाही.

८. सदर ई-निविदा अंतर्गत ऑनलाईन प्राप्त् झालेल्या कागदपत्रांनुसार निविदांची छाणनी करण्यात येईल, तथापि ऑनलाईन सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये काही शंका वाटत असल्यास अथवा सदरील कागदपत्रे स्पष्ट दिसत नसल्यास त्याबाबत मागणीकेल्यास सदर कागदपत्रांची Hard Copy कार्यालयात सादर करणे बंधनकारक राहील. ऑनलाईन व ऑफलाईन सादर केलेल्या कागदपत्रामध्ये तफावत असल्यास ऑनलाईन सादर केलेली कागदपत्रे ग्राहय धरण्यात येतील.

९. करारनामा करण्यापुर्वी निविदाधारकाने कंत्राटाच्या वार्षिक मुल्य रक्कमेच्या १० % प्रमाणे रु.---------- /- (अक्षरी रक्कम रुपये ------------------------ मात्र) एवढया रक्कमेचा राष्ट्रीयकृत बँकेची DD/FDR/BG मा.आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांचे नावे देणे बंधनकारक राहिल.

१०. निविदाधारकाने त्यांचे नांव, संपूर्ण पत्ता व संपर्क दुरध्वनी क्रमांक इत्यादीची माहिती देणे आवश्यक आहे.

११. निविदाधारकांने निविदा दरपत्रकात मनुष्यबळ सेवा पुरविण्याचे दर (GST /वस्तु व सेवाकर वगळुन ) राहतील. याची माहिती विहित केलेल्या ऑनलाईन नमुन्यातील रकान्यात स्पष्ट अंकात व अक्षरात नमुद करणे बंधनकारक आहे. कोणत्याही प्रकारची खाडाखोड करु नये.

१२. निविदा दरपत्रक सुची संकेत स्थळावर ऑनलाईन उपलब्ध करुन देण्यात येईल, त्या विहित नमुन्यात निविदा अटी व शर्तीनुसार दर भरावेत.

१३. निविदा दर भरतांना किमान वेतन अधिनियम १९४८ मधील तरतुदीचे पालन करणे आवश्यक आहे.

- **संस्था / एजन्सी यांनी ई-निविदा भरतांना दोन लिफाफा पध्दतीचा अवलंब करुन त्यापैकी वरील (अ) च्या लिफाफ्यात तांत्रिक बाबीचा व (ब ) च्या लिफाफयात वित्तीय बाबींची सही शिक्यासह कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करावेत.**

१५. महानगरपालिका निश्चित करील अशा तारखेला व वेळेवर निविदा उघडण्यात येईल. त्या दिवशी निविदाधारक किंवा त्यांच्या प्रतिनिधींना उपस्थित राहता येईल. ते गैरहजर असले तरी निविदा उघउण्यात येईल. निविदा उघडतांना प्रथम लिफाफा क्र.०१ उघडण्यात येईल. लिफाफा क्र.०१ मधील कागदपत्रे परिपुर्ण असल्यानंतरच लिफाफा क्र.०२ उघउण्यात येईल. अन्यथा अशी निविदा विचारात घेतली जाणार नाही.

१६. सदर कंत्राटांतर्गत पुरविण्यात येणाऱ्या कामगारांच्या वेतनापोटी दिनांक २२.०२.२०१९ च्या शासननिर्णयामध्ये विहित केलेल्या देयकाच्या कार्यपध्दतीबाबत च्या **जोडपत्र " अ "** मधील नमुद सर्व अटी व शर्तींचे पालन करण्याची जबाबदारी सबंधित कंत्राटदार यांची राहील.

१७. सदरचे काम हे महानगरपालिकेस करुन दिलेल्या करारनाम्याच्या अटी व शर्तीनुसार कार्यादेशामध्ये नमुद केलेल्या विभागात व दिलेल्या मुदतीत पुर्ण करुन दयावयाचे आहे.

१८. कोणतीही निविदा पुर्णपणे किंवा अंशत: स्विकारणे किंवा आलेल्या सर्व निविदा नाकारण्याचे, तसेच कोणतेही कारण न देता निविदा रद्द करण्याचा अधिकार आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांनी राखुन ठेवला आहे.

१९. निविदाधारकाने करारनामा लिहून दिल्यावर महानगरपालिकेने मागणी केल्यानुसार तात्काळ ठरवून दिलेल्या मुदतीत आवश्यक कंत्राट पध्दतीने बाहयस्त्रोताव्दारे अग्निशामक (Fireman) व वाहनचालक पुरवठा करणे बंधनकारक राहील.

२०. मंजूर निविदाधारकाने बाहयस्त्रोताव्दारे अग्निशामक (Fireman) व वाहनचालक पुरवठा करण्याचे काम खंडीत केले अथवा निविदा नियम, अटी व शर्तींचा भंग केल्यास किंवा सेवा पुरवठा करणेकामी काही तक्रारी प्राप्त झाल्यास मंजूर निविदाधारक म्हणजेच (एल - ०१) यांची अनामत रक्कम जप्त करुन सदर काम रद्द करुन, सदर कंपनीस काळया यादीत टाकण्यात येईल. तसेच (एल - ०२) कडून सदर काम / पुरवठा करुन घेण्यात येईल व फरकापोटी असणारी रक्कम (एल - ०१) कडून विहीत पध्दतीने वसुल करण्यात येईल, याची स्पष्ट नोंद घ्यावी.

२१. मंजूर निविदाधारकाकडून नियमाप्रमाणे सुरक्षा अनामत, आयकर व अन्य कर व शासनाचे वेळोवेळी लावण्यात येणारे कर देयकातून कापून घेण्यात येतील.

२२. बाहयस्त्रोताव्दारे नेमलेल्या अग्निशामक (Fireman) व वाहनचालक यांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन, विमा योजना, इ.पी.एफ, ई.एस.आय.सी. इत्यादी देय बाबी वजाती करुन तसेच वेळोवेळी मा.कामगार आयुक्त व शासनाच्या प्रचलित व सुधारित निर्देशानुसार देयक देण्याची जबाबदारी कंत्राटदाराला बंधनकाराक राहील. याबाबत महानगरपालिका प्रशासनाची कोणतीही जबाबदारी राहणार नाही.

२३. कंत्राटदाराने पुरवठा केलेल्या अग्निशामक (Fireman) व वाहनचालक यांचा प्रत्येक महिण्याचा पगार ऑनलाईन स्वरुपात सबंधितांच्या बँक खात्यात १० तारखेपर्यंत स्वत: संस्थेमार्फत अदा करावे. तद्दनंतर वेतन अदाई केल्याबाबतचा ऑनलाईन तपशील दरमहा वेतन देयकासोबत सादर करणे बंधनकारक राहील. तद्दनंतरच कंत्राटदारास मासिक देयक अदाई करण्यात येईल.

२४. महानगरपालिकेमार्फत आर्थिक अथवा प्रशासकीय कारणास्तव मासिक देयक अदाई करण्यास विलंब झाल्यास कंत्राटदाराने त्यांच्यामार्फत नियुक्त् असलेल्या कर्मचाऱ्यांना किमान ०३ महिण्यांचे वेतन स्वत:च्या निधीतून देणे बंधनकारक राहील.

२५. निविदाधारकाने सर्व प्रशिक्षित अग्निशामक (Fireman) व वाहनचालक हे महाराष्ट्र राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र या संस्थेमार्फतच प्रशिक्षण पूर्ण केलेले असावे. अन्य कोणत्याही संस्थाचे प्रशिक्षण केलेले अग्निशामक चालणार नाही याची नोंद घ्यावी.

२६. कंत्राटदाराने त्यांच्यामार्फत पुरवठा केलेल्या सबंधित अग्निशामक (Fireman) व वाहनचालक कर्मचारी यांना वैधानिक कपाती बाबतच्या (EPF, ESIC, PROFESSIONAL TAX, घरभाडे भत्ता, धुलाई भत्ता) सर्व कपाती करुन सदर कपातीचे प्रमाणित चालन देयकासोबत जोडणे बंधनकारक राहील. तद्दनंतरच देयक अदाई करण्यात येईल.

२७. कंत्राटदार यांचेमार्फत पुरवठा केल्या जाणाऱ्या कर्मचाऱ्यांना नांदेड महानगरपालिका अग्निशमन विभाग व महानगरपालिका प्रशासन यांचेमार्फत सांगितल्या जाणारे सर्व कामे / जबाबदारीने पारपाडावी लागतील. यामध्ये काही

दुर्लक्ष अथवा निष्काळजीपणा झाल्यास कंत्राटदारास लेखी नोटीस देवुन दंडात्मक कारवाई करण्यात येईल, तसेच सुरक्षा अनामत रक्कम जप्त करुन सबंधितांची निविदा रद्द करण्यात येईल.

२८. कंत्राटदार व त्यांचेमार्फत पुरवठा केले जाणारे कर्मचारी यांच्यामुळे महानगरपालिकेच्या मालमत्तेचे नुकसान झाल्यास, त्या नुकसानीची रक्कम दंड म्हणुन कंत्राटदार यांचेकडुन वसुल करण्यात येईल.

२९. कंत्राटदार व त्यांचेमार्फत पुरवठा केले जाणारे कर्मचारी यांचेमध्ये कोणताही तंटा / वाद निर्माण झाल्यास नांदेड महानगरपालिका प्रशासन हस्तक्षेप करणार नाही.

३०. कंत्राटदार यांचेमार्फत पुरवठा केल्या जाणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या रजेच्या दिवशी अथवा अनुपस्थिती कालावधीमध्ये त्याच अर्हतेचा / पात्रतेचा दुसरा कर्मचारी विनाविलंब तात्काळ उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. कर्मचारी उपलब्ध न झाल्यास प्रती दिवस ५०० प्रमाणे कंत्राटदारास दंड आकारण्यात येईल.

३१. सदर कंत्राटामार्फत पुरविण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांचा नियमित आस्थापनेशी काहीही सबंध असणार नाही. तसेच महानगरपालिका सेवेत सामावून घेण्याचे हक्क कंत्राटदारास / कर्मचाऱ्यास असणार नाहीत.

३२. निष्काळजीपणा, अज्ञात, सहेतुक कार्यवाही अथवा अन्य कारणाने कंत्राटदाराशी / सेवा पुरविणाऱ्या व्यक्तीशी सबंधित पुरवठा कामामध्ये व्यत्यय आल्यास अथवा महानगरपालिका मालमत्तेची हानी झाल्यास किंवा अन्य दोष राहील्यास, कोणताही बोजा निर्माण झाल्यास, उपलब्ध अभिलेख्यानुसार होणारी नुकसान भरपाई सबंधित कंत्राटदार, व्यक्ती, संस्थाकडून देयक / अनामत रक्कम किंवा कायदेशरी मार्गाने वसुल केली जाईल.

३३. कंत्राटदाराने सर्व्हीस चार्जेस / प्रशासकीय दर निरंक, कमी दराने किंवा अंदाजपत्रकीय दराने देण्यात येवू नयेत, असे केल्यास कंत्राटदाराला निविदेमधून अपात्र करण्यात येईल.

३४. या कामी लेखा परिक्षणास काही आक्षेप आल्यास त्याची योग्य पुर्तता करण्याची जबाबदारी मंजूर कंत्राटदारावर राहील.

३५. दरमहा कामाचे परिपूर्ण देयक अग्निशमन अधिकारी, अग्निशमन विभाग, मनपा नांदेड यांचेकडे सादर करावे.

३६. मुदतीच्या आत कंत्राटदार यांचे कंत्राट मुदतीपूर्व रद्द करण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवला असून, यासाठी १५ दिवसाची पुर्व सुचना देण्यात येईल.

३७. प्रचलित शासकीय नियम पाळणे तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी निविदाधारकांवर राहील, तसेच वरील कामी आवश्यक ते सर्व परवाने निविदाधारकाने सबंधित कार्यालयाकडून घेणे बंधनकारक राहील.

३८. नांदेड महानगरपालिका अग्निशमन विभाग व महानगरपालिका प्रशासन यांचेमार्फत देण्यात आलेल्या सर्व आदेशाची अंमलबजावणी करावी लागेल, महानगरपालिकेच्या हिताच्या दृष्टीने सर्व नियमाचे पालन करावे लागेल. महानगरपालिकेच्या हिताविरुध्द कार्यवाही करता येणार नाही. कार्यालयीन कामकाजात गोपनीयता राखावी लागेल. अन्यथा नियमानुसार कार्यवाही करण्याचा अधिकार आयुक्त, नांदेड महानगरपालिका यांना राहील.

३९. कंत्राटदार यांचेमार्फत पुरवठा करण्यात येणाऱ्या अग्निशामक (Fireman) व वाहनचालक यांच्या कामासंदर्भात उभयपक्षी कायदेशीर वाद उद्‌भवल्यास नांदेड न्यायालयास अधिकार राहतील.

४०. सदर कंत्राटातंर्गत मुळ कंत्राटदारास देण्यात आलेले सेवा पुरवठा करण्याचे काम सबकॉन्ट्रक्टर/सब कंपनी किंवा इतर व्यक्तीला देता येणार नाही.

४१. सदरची निविदा मिळण्याकरिता अधिकारी यांच्यावर कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्याचे कोणत्याही क्षणी आढळल्यास निविदाधारक/यशस्वी निविदाधारक यांची निविदा रद्द करण्यात येईल व सदर निविदाधारक यांना काळया यादीत टाकण्याची कार्यवाही करण्यात येईल.

४२. निविदाधारकांची निविदा नामंजूर झाल्यास त्यांच्या EMD परत मिळण्यासाठी अर्ज केल्यास सबंधितांची EMD रक्कम परत करण्यात येईल. तथापि सदर EMD रक्कमेवर कोणतेही व्याज आकारले जाणार नाही.

४३. निविदा मंजूर करण्यात आलेल्या सबंधित कंत्राटदार यांनी महानगरपालिकेबरोबर ठरवून दिलेल्या कामाचा करारनामा नियमानुसार त्वरीत करुन द्यावा. तद्नंतर कार्यादेश देण्यात येईल. करारनाम्यातील अटी व शर्ती सबंधितांवर बंधनकारक राहतील.

४४. पुरविण्यात येणाऱ्या सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांना कार्यालयीन वेळ, शिस्त, कार्यालयीन कामकाज व इतर कोणतेही वेळोवेळी सोपविलेले काम विभागातील कार्यरत इतर स्थायी अग्निशमन कर्मचारी यांच्याप्रमाणेच जबाबदारीने पारपाडावे लागेल, त्यात निष्काळजीपणा अथवा दुर्लक्ष झाल्यास नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

४५. मंजूर निविदाधारकांनी बाहयस्त्रोताव्दारे प्रशिक्षित अग्निशामक (Fireman) व वाहनचालक पुरवठा करण्यापुर्वी या कार्यालयात आवश्यकतेप्रमाणे नियुक्त करण्यात येणाऱ्या अग्निशामक (Fireman) व वाहनचालक यांचे अर्हता / पात्रतेनुसार सर्व शैक्षणिक कागदपत्रे व फिटनेस प्रमाणपत्र अग्निशमन विभाग, मनपा नांदेड येथे दोन प्रतीत स्वयं:साक्षांकित करुन छायाचित्रासह जमा करणे बंधनकारक राहील. सदर जमा करण्यात आलेल्या कागदपत्रांची पडताळणी करण्यात येईल, त्यामध्ये बोगस कागदपत्रे आढळल्यास कंत्राटदारावर व सबंधित पुरवठा करण्यात येणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात येईल.

४६. कंत्राटदारास / पुरवठादारास रक्कम अदा करतांना आयकर आणि वस्तु व सेवाकर कायाद्यातील तरतुदीनुसार आयकराची / वस्तु व सेवाकराची रक्कम कपात करुन उर्वरीत रक्कम अदा केली जाईल.

४७. व्यवसाय कर भरण्याची जबाबदारी सबंधित कंत्राटदार / पुरवठादार यांची राहील.

४८. पात्र ठरलेल्या कंत्राटदाराचे / पुरवठादाराचे एकूण दरावरुन न्युनतम दर स्विकृत करण्यात येतील.

४९. कंत्राटदाराकडून / पुरवठादाराकडून करारनाम्यातील कोणत्याही अटी व शर्तींचे उल्लंघन झाल्यास निविदा कोणत्याही स्तरावर रद्द करण्यात येतील व त्यातील कोणतीही रक्कम देय राहणार नाही. जमा केलेल्या सुरक्षा ठेवीची रक्कम जप्त केली जाईल.

५०. कंत्राटी कर्मचारी वेळेवर कार्यालयात उपस्थित न झाल्यास किंवा विना परवानगी गैरहजर राहिल्यास त्या दिवसांचे वेतन अदा करण्यात येणार नाही.

**५१. निविदा दर समान प्राप्त झाल्यास निविदाधारकाचा त्या क्षेत्रातील तांत्रिक मनुष्यबळ पुरवठा करण्याचा पुर्वानुभव, संख्यात्मक क्षमता व वार्षिक उलाढाल विचारात घेवून प्राधान्य क्रम निश्चित करण्यात येईल.**

५२. निविदेचा कंत्राट कालावधी संपुष्टात आल्यानंतर कामाचा अनुभव लक्षात घेवुन ०१ वर्षापर्यंत मुदतवाढ देण्याचे अधिकार आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना राहतील.

५३. कायमस्वरुपी शासकीय नौकरीसाठी कार्यालयात/शासनाकडे/न्यायालयाकडे दावा अथवा खटला करता येणार नाही. अशा आशयाचे हमीपत्र १०० रुपयांच्या बॉंडपेपरवर नोटरीकृत करुन सेवेत हजर होतांना सबंधित कंत्राटी कर्मचाऱ्यांना सादर करणे बंधनकारक असेल. त्याशिवाय रुजू करुन घेण्यात येणार नाही.

५४. पुरवठा केल्या जाणाऱ्या प्रशिक्षित अग्निशामक (Fireman) व वाहनचालक यांनी दर दिवशी किमान आठ तास काम करणे बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे वेळेस अत्यावश्यक बाबी सबंधी आवश्यकता निर्माण झाल्यास सदर प्रशिक्षित अग्निशामक (Fireman) व वाहनचालक यांना जास्तीचे काम करावे लागेल व त्याचा कोणताही वेगळा मोबदला महानगरपालिकाकडुन दिला जाणार नाही, त्याची जबाबदारी कंत्राटदार यांची राहील.

५५. अग्निशमन सेवा ही शिस्तबध्द सेवा असल्यामुळे शिस्तीचे पालन करणे बंधनकारक राहिल त्याचप्रमाणे शांततेच्या काळात शाररिक कवायती, परेड, फायर ड्रिल, मॉक ड्रिल इत्यादी व त्यांचे कर्तव्य योग्य त्या पध्दतीने बजावणेसाठी व त्याकरीता त्यांची कार्यक्षमता व शाररीक क्षमता जोपासण्यासाठी आवश्यक ते सराव अग्निशामक (फायरमन) यांना करणे बंधनकारक राहील. तसेच राष्ट्रीय, शासकीय व राज्य पातळीवरील महत्वाचे शासकीय कार्यक्रम उदा - स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन, महाराष्ट्र दिन, अग्निशामक सेवा सप्ताह, इतर शासकीय कार्यक्रमात अथवा मोहीममध्ये सहभागी

होणे, प्रात्यक्षिके, सामुदायिक परेड, अग्निशमन कवायत स्पर्धा तसेच महत्वाच्या परेड संचलनात भाग घेणे बंधनकारक राहील.

५६. पुरवठा करण्यात येणारे प्रशिक्षित अग्निशामक (Fireman) व वाहनचालक यांनी कोणत्याही प्रकारचे नशापाणी न करता कामकाजाच्या वेळेत कर्तव्य बजावणे बंधनकारक राहील. सबंधित सर्व प्रशिक्षित अग्निशामक हे अग्निशमन अधिकारी व शिफ्ट् इनचार्ज, अग्निशमन विभाग, मनपा नांदेड यांच्या नियंत्रणाखाली काम करतील. त्यांच्या आदेशाचे पालन न केल्यास/गैरवर्तन अरेरावीची भाषा केल्यास अग्निशमन अधिकारी यांचे रिपोर्टनुसार कंत्राटदार यांना सबंधित कर्मचाऱ्याला कामावरुन काढण्याची प्रक्रिया करणे बंधनकारक राहील.

५७. अग्निशमन विभागाने सुचना दिल्याप्रमाणे कोणतेही काम उदा. फायर कॉल, अदर कॉल, स्पेशल कॉल, गणेश विर्सजन घाटावर बंदोबस्त व इतर आपत्कालीन कामाच्या ठिकाणी कर्तव्य बजावण्याविषयी दिलेलया आदेशाचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहील.

५८. पुरविण्यात येणाऱ्या अग्निशामक (Fireman) व वाहनचालक चा अपघात झाल्यास सदर कर्मचाऱ्यास होणारे नुकसान भरपाई सबंधित कंत्राटदाराकडून वसुल करणेत येईल. तसेच कर्मचाऱ्यांना अपघातामध्ये जीवीतहानी अथवा वित्तहानी झाल्यास त्याची भरपाई, तसेच फौजदारी व न्यायालयीन दाव्याबाबत कार्यवाही करण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदार यांची राहील. याबाबत नांदेड महानगरपालिका प्रशासन जबाबदार राहणार नाही व त्याबाबत कोणताही मोबदला महानगरपालिकाकडून दिला जाणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी निविदाधारकाची / कंत्राटदाराची राहील.

५९. कंत्राटदाराने पुरवठा केलेल्या दररोज उपस्थित असलेल्या अग्निशामक (Fireman) व वाहनचालक दैनंदिन अहवाल/ उपस्थितीपट अग्निशमन विभागाने ठरवून दिलेल्या विहित नमुन्यात सबंधित शिफ्ट् इनचार्ज यांच्याकडुन दररोज तपासणी करुन महिना अखेर अग्निशमन अधिकारी यांचेकडुन प्रमाणित करुन घेवुन मासिक देयकाबरोबर सादर करणे बंधनकारक राहील.

६०. कंत्राटदाराचे काम समाधानकारक नसणे, प्रशिक्षित अग्निशामक (फायरमन) पुरविण्यात अनियमितता असणे प्रशिक्षित अग्निशामक (Fireman) व वाहनचालक यांचे कार्य समाधानकारक नसणे, वर्तन चांगले नसणे, अटी व शर्तीचे उल्लंघन करणे या कारणास्तव करारनामा रद्द करण्यात येईल. करारनामा उपरोक्त कारणास्तव रद् करणेचा पूर्ण अधिकार आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांचा असेल.

६१. निविदाधारकाने पुरविण्यात येणाऱ्या प्रशिक्षित अग्निशामक (Fireman) व वाहनचालक यांना स्वतःचा गणवेश असणे तसेच संस्थेच्या नावाचे ओळखपत्र देणे बंधनकारक आहे. निविदाधारकाने अग्निशमन विभाग, मनपा नांदेड च्या नियमाप्रमाणे आवश्यक असणारे संपूर्ण गणवेश (रेमंड ट्रोविनचे नेव्ही ब्ल्यु रंगाचे ०२ पँट, ०१ टयुनिक कोट व फिकट निळा रंगाचा ०२ शर्ट तसेच ०१ गमबुट, ०१ लेदर बुट, ०१ बॅरेट कॅप) सबंधितांना पुरविणे बंधनकारक राहील.

६२. कंत्राटदारामार्फत पुरवठा केल्या जाणाऱ्या अग्निशामक (Fireman) व वाहनचालक यांना दररोज कर्तव्यावर वेळेवर कामाच्या ठिकाणी हजर राहण्यासाठी स्वखर्चाने हजर राहण्याची जबाबदारी सबंधिताची राहील. यासाठी मनपा प्रशासनाकडुन कोणताही अतिरिक्त भत्ता दिला जाणार नाही.

६३. कंत्राटदाराने नेमलेल्या कर्मचाऱ्यांचे वेतन, रजा, ग्रॅज्युटी, विमा, कामगार विमा योजना, पी.एफ. इत्यादी देय बाबी देण्याची सर्व जबाबदारी कंत्राटदाराची राहील. याबाबत नांदेड महानगरपालिकेची कोणतीही जबाबदारी राहणार नाही. तसेच या सबंधित कंत्राटदाराबरोबर व पुरवठा केलेले अग्निशामक (Fireman) व वाहनचालक यांच्यामध्ये काही तंटा निर्माण झाल्यास कोणतीही समस्या उदभ्वल्यास त्यास निविदाधारक / कंत्राटदार जबाबदार राहील.

६४. अग्निशमन व आणीबाणी सेवा ही आप्तकालीन सेवा आहे, त्यामुळे आवश्यकतेनुसार आयुक्त, मनपा नांदेड यांच्या मान्यतेनंतर व आदेशाप्रमाणे वेळोवेळी वाढीव प्रशिक्षित अग्निशामक (Fireman) व वाहनचालक तातडीने उपलब्ध करुन देणे हे सबंधित कंत्राटदार यांना बंधनकारक राहील.

६५. कंत्राटदारासोबत करण्यात आलेला करारनामा ०१ वर्षासाठी असेल व हा कालावधी कार्यादेशाच्या दिनांकापासून सुरु होईल. तसेच कंत्राटदाराने कार्यादेशापासून ३० दिवसात मागणीप्रमाणे सर्व प्रशिक्षित अग्निशामक (Fireman) व वाहनचालक पुरवठा केले नसल्यास प्रति दिवसासाठी रु.५००/- दंड कंत्राटदारास आकारण्यात येईल. तसेच ९० दिवस

पुर्ण झाल्यानंतर सुरक्षा अनामत रक्कम जप्त करुन कंत्राट रद्द करण्यात येईल. दंड आकाराणी माफ करण्याचे अधिकार आयुक्त, मनपा नांदेड यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम राहील.

**मा.संचालक, अग्निशमन संचालनालयाकडून विहित करण्यात आलेल्या सेवा प्रवेश नियमानुसार सबंधित कंत्राटदार यांचेकडुन पुरवठा केले जाणारे प्रशिक्षित अग्निशामक (Fireman) व वाहनचालक यांची शैक्षणिक पात्रता, शारीरिक पात्रता, वयोमर्यादा व इतर आवश्यक अटी खालीलप्रमाणे अट बंधनकारक राहतील.**

अ) किमान शैक्षणिक व तांत्रिक पात्रता –

१) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत परीक्षा (SSC) उत्तीर्ण असणे आवश्यक.

२) राष्ट्रीय/राज्य अग्निशमन प्रशिकृषण केंद्र, महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादामी, मुंबई यांचा ०६ महिने कालावधीचा अग्निशमन प्रशिक्षण पाठयक्रम/प्रगत पाठयक्रम (Advance Course) उत्तीर्ण असावा.

३) वैध जड वाहन चालविण्याचा परवाना आवश्यक (केवळ वाहनचालकांसाठी)

४) जड वाहन चालक म्हणुन ०३ वर्षे काम केल्याचा अनुभव असणे आवश्यक (केवळ वाहनचालकांसाठी)

५) MSCIT परीक्षा उत्तीर्ण असावी.

६) मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक.

ब) शारीरिक पात्रता –

१) उंची १६५ सें.मी.

२) छाती – साधारण ८१ सें.मी. , फुगवून – ५ से.मी. जास्त

३) वजन – ५० कि.ग्रॅ.

४) दृष्टी – चांगली ( विना चष्माने दृष्टी – ६/६ तसेच Ishihara Charat नुसार रंगदृष्टीने चांगली )

क) इतर अटी –

१) पोहता येणे आवश्यक

२) कोणताही शारिरीक व्यंग नसावा.

ड ) वयोमर्यादा – उमेदवारांचे वय ३० वर्षापेक्षा जास्त असू नये.

अतिरिक्त आयुक्त,

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागासाठी

बाहयस्त्रोताव्दारे प्रशिक्षित अग्निशामक (Fireman) व प्रशिक्षित वाहनचालक पुरवठा करणेकरिता सदर निविदा ऑनलाईन स्वरुपात सादर करण्यापुर्वी खालीलप्रमाणे दोन लिफाफा पध्दतीने निविदा दाखल कराव्यात.

अ) लिफाफा क्र.०१ (आवश्यक कागदपत्रे)

**नोट - लिफाफा क्र.01 मध्ये खालील आवश्यक कागदपत्रे/प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक आहे.**

| अ.क्र. | कागदपत्राचे/प्रमाणपत्रांचे विवरण |
|---|---|
| १ | निविदा शुल्क व EMD रक्कम भरणा केल्याची पावती सादर करावी. |
| २ | महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम अंर्तगत संस्था/कंपनी नोंदणीकृत असलेले नोंदणी प्रमाणपत्र सादर करावे. |
| ३ | सहा.आयुक्त कामगार यांचे (लेबर लॉ) लायसेन्सं किंवा नोंदणी प्रमाणपत्र सादर करावे. |
| ४ | भविष्य निर्वाह निधी (EPF) नोंदणी प्रमाणपत्र सादर करावे. तसेच EPF भरणा केलेले मागील ०३ वर्षाचे प्रमाणित चालन व ECR सादर करावे. |
| ५ | ESIC नोंदणी प्रमाणपत्र सादर करावे, तसेच ESIC भरणा केलेले मागील ०३ वर्षाचे प्रमाणित चालन व contribution सादर करावे. |
| ६ | व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्र सादर करावे, तसेच व्यवसाय कर भरणा केलेले मागील ०३ वर्षाचे प्रमाणित चालन व रिर्टन्स सादर करावे. |
| ७ | वस्तु व सेवाकर (GST) नोंदणी प्रमाणपत्र सादर करावे, तसेच मागील ३ वर्षातील GST Return भरल्याची प्रमाणित विविरणपत्रे सादर करावीत. |
| ८ | मागील ३ वर्षातील आयकर (३Yrs. ITR) भरल्याची प्रमाणित विविरणपत्रे सादर करावीत. |
| ९ | मागील ३ वर्षाचे वार्षिक उलाढालीचे सी.ए. (C.A.) कडून प्रमाणित केलेले ताळेबंद अहवाल सादर करावा. |
| १० | मागील किमान ०३ शासकीय/निमशासकीय कार्यालये/स्थानिक स्वराज्य संस्था/सार्वजनिक उपक्रम येथे प्रशिक्षित अग्निशामक (Fireman) सेवा पुरवठा केल्याचे पुरवठा आदेश व सबंधित कार्यालयाने दिलेले अनुभव प्रमाणपत्र सादर करावेत. |
| ११ | निविदाधारक यांच्या संस्थेकडे/एजन्सीकडे उपलब्ध असलेल्या प्रशिक्षित अग्निशामक (Fireman) व प्रशिक्षित वाहनचालक (राष्ट्रीय/राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादामी, मुंबई यांचा ०६ महिने कालावधीचा अग्निशमन प्रशिक्षण पाठयक्रम/प्रगत पाठयक्रम (Advance Course) उत्तीर्ण असलेले ) यांची साक्षांकित यादी सादर करावी. |
| १२ | निविदाधारकांनी त्यांच्या संस्था/एजन्सीचे नांव कोणत्याही शासकीय/निमशासकीय कार्यालयाच्या काळ्या यादीत नसल्याचे तसेच त्यांच्या संस्थेविरुध्द कोणत्याही प्रकारची फौजदारी, दंडात्मक कारवाई करण्यात आली नसल्याचे व कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल नसल्याचे नोटरीकृत शपथपत्र रुपये ५००/- च्या बाँडपेपर सादर करावे. |
| १३ | निविदाधारकांनी त्यांच्या संस्था/एजन्सीमार्फत नेमण्यात येणारे प्रशिक्षित अग्निशामक (Fireman) यांना कोणत्याही प्रकारचे व्यसन नसल्याबाबतचे रु.१०० च्या बाँडवर नोटरीकृत शपथपत्र सादर करावे. |
| १४ | वैयक्तिक हितसंबंधाचा संघर्ष (Confilict of interest) टाळण्यासाठी ज्या निविदाधारकाला निविदा लागली असेल. त्यांना सदर निविदेचा कालावधी संपेपर्यंत नांदेड महानगरपालिकेतील इतर कोणत्याही विभागातील निविदा अथवा ठेका स्विकारता येणार नाही. |
| १५ | सदर ई-निविदा प्रणाली अंतर्गत अपलोड करण्यात आलेली कागदपत्रे खरी असल्याबाबतचे स्वंयघोषणापत्र सादर/अपलोड करणे बंधनकारक आहे. |

वर नमुद केलेली तांत्रिक माहिती व त्याबाबतच्या मुळ प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती सदरच्या निविदामध्ये ऑनलाईन सादर केली नसेल, तर निविदा ग्राहय धरली जाणार नाही.

अतिरिक्त आयुक्त,

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

## ब) लिफाफा क्र.०२ (दरपत्रक सुची)

| अ.क्र. | परिशिष्ट – " अ " किमान वेतन अधिनियमातील तरतुदीनूसार कुशल कर्मचाऱ्यास देय होणाऱ्या बाबीनुसार प्रती कंत्राटी प्रशिक्षित अग्निशामक (Fireman) व वाहनचालक यांना दरमहा देय ठरणारे वेतन तपशील (परिमंडळ ०१ करिता) खालीलप्रमाणे आहे. | |
|---|---|---|
| | तपशील | प्रती कंत्राटी प्रशिक्षित अग्निशामक (Fireman) व वाहनचालक यांना देय होणारे दरमहा वेतन रक्कम रुपये |
| १ | स्थूल वेतन | १४००० |
| २ | विशेष भत्ता (राहणीमान भत्ता) | ९४८५ |
| | (A) एकुण किमान वेतन | २३४८५ |
| ३ | घरभाडे भत्ता (१+२) ५ % | ११७४.२५ |
| ४ | इतर भत्ते (धुलाई भत्ता) | ७५ |
| | (B) एकुण भत्ते | १२४९.२५ |
| ५ | EPF (1+2 वर 15000/- बेसिक गृहीत धरुन) 13% | १९५० |
| | (C) वैधानिक कपाती | १९५० |
| ६ | एकुण मासिक (A+B+C) वेतन प्रती फायरमन रुपये | २६६८४.२५ |
| | परिशिष्ट – " ब " खालीलप्रमाणे | |
| ७ | (D) प्रशासकीय / सर्व्हीस चार्जेस दर (Service Charges) कमीत कमी ३.५ % च्या वर टाकणे आवश्यक राहील. | -------- |
| ८ | (E) वस्तु व सेवा कर (GST) (A+B+C+D) १८ % | ------ |
| ९ | कंत्राटाची एकुण किंमत (A+B+C+D+E) | ---------------- |

टिप -

१) निविदाधारकांनी वरील विवरणातील (A) मध्ये कोणतेही दर भरावयाचे नसुन, त्यामध्ये कोणताही बदल होणार नाही.

२) किमान वेतन अधिनियमानुसार देय ठरणाऱ्या एकुण प्रती अग्निशामक (Fireman) व वाहनचालक यांच्या मासिक मानधन दरावर निविदाधारकांच्या संस्थेस दयावयांचे सर्व्हीस चार्जेस / प्रशासकीय चार्जेस दर अ.क्र.०७ मधील (D) मध्ये फक्त टक्केवारी (Percentage) नमुन्यात दर भरावेत. सदरचे दर रुपयामध्ये भरणा केल्यास निविदा ग्राहय धरल्या जाणार नाही.

३) विहित शासन निर्णयातील तरतुदीनूसार सर्व्हिस चार्जेस दर कमीत कती ३.५ टक्के च्या खाली नमुद केल्यास निविदा ग्राहय धरण्यात येणार नाही.

अतिरिक्त आयुक्त,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
अग्निशमन व आणीबाणी सेवा विभाग

## <u>कंत्राटदारांसाठी आचारसंहिता</u>

१. निविदा सादर करण्यापुर्वी अन्य निविदाधारकांसमवेत तडजोड करुन अथवा अन्य कंत्राटदारांना दमदाटी करुन त्यांना सदरची निविदा भरणेपासुन परावृत्त करु नये.
2. निविदाधारकांनी निविदासोबत ऑनलाईन सादर केलेल्या कागदपत्रांच्या सत्येतेबाबत काही प्रश्न निर्माण सदर कागदपत्रांच्या मुळ प्रती कार्यालयास सादर करण्याची सर्वस्वी जबाबदारी सबंधित निविदाधारक यांची राहील.
3. स्वत:चे नावावर मिळालेले काम अन्य् कंत्राटदार यांना करणेसाठी देऊ नये.
4. अन्य कंत्राटदारासमवेत निकोप स्पर्धा करुन स्वत: भरलेली निविदा दर जाहीर करु नयेत अथवा दुसऱ्या कंत्राटदारावर धाक दाखवून तशी जबरदस्ती करु नये.
5. सबंधित अधिकारी तसेच अन्य कंत्राटदारांवर राजकीय अथवा अन्य कोणतेही दडपण आणू नये.
6. कामगारांसबंधी असलेल्या सर्व कायदयांचे काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदारी कंत्राटदार यांची राहील, त्याची तोशिष नांदेड महानगरपालिकेवर राहणार नाही याची सबंधितांनी नोंद घ्यावी.
7. काम करताना सबंधित अधिकाऱ्यांच्या सूचनांचे तंतोतंत पालन करुन योग्य दर्जाचे काम करुन देणे आवश्यक आहे.

मी/आम्ही वरील सर्व अटी नियम यांचे अधीन राहूनच कामासाठी निविदा सादर करीत आहे / आहेत. वरील सर्व अटी माझ्यावर / आमच्यावर बंधनकारक राहतील व यापैकी कोणत्याही अटींचा भंग केल्यास माझा / आमचा कंत्राटदार नोंदणी दाखल रद्द होऊ शकतो याची मला / आम्हाला जाणीव आहे. तसेच या अटीचा भंग होवून मनपास कोणतीही आर्थिक तोशीष लागल्यास त्याची सर्व जबाबदारी / आमच्यावर राहील.

कंत्राटदाराची स्वाक्षरी व
पुरवठा संस्थेचा शिक्का

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभाग

निविदा क्रमांक ---------------/ २०२६-२७

## कंत्राटदारांचे प्रतिज्ञापत्र

नांदेड महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडील निविदा क्र.-----------२०२६/२७ ------------- ---------------------------------------- बाबतची निविदा मी / आम्ही ऑनलाईन सादर केलेली आहे. सदर निविदा अटी व शर्तींप्रमाणे **लिफाफा क्र.01 (कागदपत्रे)** यामध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांची पूर्तता मी / आम्ही केलेली आहे. सदरची कागदपत्रे ही माझ्या माहितीप्रमाणे सत्य आहेत.

या प्रतिज्ञापत्राव्दारे मी / आम्ही आमचे कुटूंबिये / नातेवाईक नांदेड महानगरपालिकेमध्ये नौकरीस आहेत / नाहीत. याबाबतची माहिती खालीलप्रमाणे -

निविदाधारकांचे सबंधित नांदेड महानगरपालिकेमध्ये असलेल्या व्यक्तीचे नांव -------------------------- ------------------------------------------------------ हुद्दा ----------------- निविदाधारकांशी असलेले नांते-----------------------------------

सदरची माहिती खोटी आढळल्यास निविदा प्रक्रियाच्या कोणत्याही टप्यावर माझ्यावर कायदेशीर कारवाई करणेस माझी काहीही हरकत नाही.

निविदाधारकांची स्वाक्षरी

निविदाधारकांचे नांव ---------------------------------

निविदा संस्थेचे संपूर्ण नांव व पत्ता ----------------------

----------------------------------------------

**टिप** - सदरचे प्रतिज्ञापत्र निविदाधारकानी निविदा दाखल करतांना स्वाक्षरी करुन ऑनलाईन सादर करावे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभाग
निविदा क्रमांक ---------------/ २०२६-२७

## कंत्राटदारांचे हमीपत्र

नांदेड महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडील निविदा क्र.-----------२०२६/२७ अन्वये कंत्राट पध्दतीने प्रशिक्षित अग्निशामक (Fireman) व वाहनचालक पुरविण्याबाबतचा ऑनलाईन आलेला निविदा प्रारुप आणि त्यामधील सर्व अटी व शर्ती मी / आम्ही काळजीपूर्वक वाचल्या असुन, सदर निविदामधील सर्व अटी व शर्ती मला / आम्हाला मान्य आहेत, त्यानुसार मी / आम्ही ही ऑनलाईन निविदा सादर केलेली आहे. मी / आम्ही ऑनलाईन ई-निविदा प्रक्रियामध्ये सादर केलेले सर्व कागदपत्रे माझ्या माहितीप्रमाणे सत्य आहेत.

तसेच सदर टेंडर प्रकरणी माझ्या संस्थेमार्फत पुरविण्यात आलेल्या सर्व कामगारांची लेबर लॉ अंतर्गत येणाऱ्या सर्व बाबी कामगार विषयक कायदयांची पूर्तता करण्याची सर्वस्वी जबाबदारी माझ्या संस्थेची राहील. या संदर्भात एखादा कायदेशीर प्रश्न उद्भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी माझ्या संस्थेची राहील व ते माझ्यावर बंधनकारक राहील. औद्योगिक व कामगार कायद्यातील सर्व तरतुदीचे पालन करण्याची जबाबदारी सुध्दा माझी / माझ्या संस्थेची राहील.

तसेच निविदा अंतिम झाल्यानंतर निविदा अटी व शर्तीतील तरतुदीनूसार आवश्यक शैक्षणिक पात्रता, शारीरिक पात्रता, वयोमर्यादा व इतर सर्व अटींची पुर्तता करुन, सबंधितांचे मुळ कागदपत्रे कार्यालयास सादर करुन, पडताळणी अंती पात्र ठरणाऱ्या प्रशिक्षित अग्निशामक (Fireman) व प्रशिक्षित वाहनचालक चा पुरवठा करण्याची जबाबदारी माझी / माझ्या संस्थेची राहील. मी / आम्ही सादर केलेल्या संस्थेच्या अथवा पुरविण्यात येणाऱ्या प्रशिक्षित अग्निशामक (Fireman) व प्रशिक्षित वाहनचालक च्या कागदपत्रांबाबत काही प्रश्न निर्माण झाल्यास किंवा सदरची कागदपत्रे खोटी असल्याचे आढळून आल्यास निविदाच्या कोणत्याही टप्प्यावर माझ्यावर कायदेशीर कारवाई करणेस, निविदापोटी भरलेली बयाणा व अनामत रक्कम जप्त करणेस अगर माझे किंवा माझ्या संस्थेचे नांव काळया यादीत समाविष्ट करणेस माझी काहीही हरकत नाही.

निविदाधारकांची स्वाक्षरी

निविदाधारकांचे नांव --------------------------------

निविदा संस्थेचे संपूर्ण नांव व पत्ता --------------------

----------------------------------------------